# उप वनसंरक्षक रोहा, वनविभाग रोहा यांचे कार्यालय

मु.पो.ता.रोहा, जि.रायगड दुरध्वनी क्रमांक.02194-235755
Email :- dycfroha@mahaforest.gov.in

पत्र
RPAD

विषय :- **वनजमिन रायगड.**
नागलोली साठवण तलाव, ता.श्रीवर्धन जि.रायगड अंतर्गत वनजमिन मागणी प्रस्ताव क्षेत्र 6.50 हे.

जावक क्रमांक व/20/जमीन/ 2719 /2017-18.
रोहा 402 109, दिनांक:- 09 /10/2017.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्त.)विभाग,
कळवा, ठाणे.

संदर्भ:- 1) केन्द्रशासनाचे पत्र क्र.एफसी-2/एमएच-12/2015-एनजीपी/2342 दि.02.09.2017.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपुर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-17/NC/II/ID.12380/(56)/1415/17-18 दि.14.09.2017.

नागलोली ल.पा.योजना ता.श्रीवर्धन येथील साठवण तलावा करीता 6.50 हे. वनजमीन मागणी प्रस्तावास केंन्द्रशासनाचे वरील संदर्भ क्रमांक 01 चे पत्रान्वये अटींचे अधिन राहुन तत्वत: मान्यता दिलेली आहे. सोबत पत्राची छायांकित प्रत आपले सुलभ संदर्भाकरिता जोडून पाठविण्यात येत आहे. प्रकरणी केंन्द्रशासनाचे तत्वत: मान्यतेच्या पत्रामध्ये घातलेल्या अटींची पुर्तता होणे आवश्यक आहे.

1) **अट क्रमांक 1**- सदर प्रस्तावाअंतर्गत वळते होणा-या क्षेत्राचा वैधानिक दर्जा वन असा कायम राहिल.
2) **अट क्रमांक 2**- प्रस्तावाअंतर्गत वळते होणा-या क्षेत्रा इतकेच वनेत्तर क्षेत्रामध्ये पर्यायी वनीकरणाची योजना प्रकल्प यंत्रणेच्या निधीतुन वन विभागाकडून वनिकरण होऊन त्यांचे संगोपन करण्यात येईल.
3) **अट क्रमांक 3**- पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर क्षेत्र हे वन विभागाचे नावांने हस्तांतरित करणे आवश्यक आहे, त्याकरिता पर्यायी वनेत्तर क्षेत्र हे वन विभागाचे नांवे करण्यांत येऊन सदर क्षेत्राचे 7/12 उतारे, फेरफार उतारे, सादर करण्यांत यावेत. सदरचे वनेत्तर क्षेत्र ताब्यांत मिळल्याबाबत संबंधित उप वनसंरक्षक यांचेकडून जमिन ताब्यांत घेतल्याबाबत ताबापावती, नकाशा, KML पॉलीगॉन इ. उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
4) **अट क्रमांक 4**- पर्यायी वनीकराणाचे वनेत्तर क्षेत्र हे भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 अंतर्गत राखीव वन किंवा कलम 29 अन्वये संरक्षित वन म्हणुन घोषित करणेबाबची कार्यवाही संबंधित उप वनसंरक्षक यांचेकडून होणे आवश्यक आहे.
5) **अट क्रमांक 5**- वळते होणा-या क्षेत्राचे बदल्यांत पर्यायी वनीकरणाकरिता 6.50 हे. वनेत्तर क्षेत्रावर प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनीकरण करणेचे आहे. त्याकरिता पर्यायी वनीकरणासाठी सन 2017-18 आर्थिक वर्षाकरिता रक्कम रू.4,96,523/- प्रति हेक्टर या प्रमाणे रक्कम रू.32,27,400/-(बत्तीस लाख सत्ताविस हजार चारशे

मात्र) शासनाचे www.forestclerance.nic.in या संकेतस्थळावर लॉगइन करून चलन जनरेट करून भरणा करावी व भरणा केलेल्या चलनाची प्रत या कार्यालयात पुर्तता अहवालासोबत सादर करावी.

6) **अट क्रमांक** 6- वळते होणारे 6.50 हे. क्षेत्राचे ची नेट प्रेझेंट व्हॅल्यूची रक्कम (NPV) 9,39,000/- याप्रमाणे रक्कम रू.61,03,500/- (एकसष्ट लाख तीन हजार पाचशे) मात्र एवढी भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम www.forestclerance.nic.in या संकेतस्थळावर ऑनलाईन लॉगइन करून चलन जनरेट करून भरणा करावी व भरणा केलेल्या चलनाची प्रत या कार्यालयात पुर्तता अहवालासोबत सादर करावी.

7) **अट क्रमांक** 7- सुप्रिम कोर्टाचे नियुक्त केलेल्या एक्सपर्ट कमिटीचे शिफारशीनुसार अधिकची नेंट प्रेझेंट व्हॅल्युची रक्कम भरणेस तयार असल्याबाबत हमीपत्र देणे आवश्यक आहे.

8) **अट क्रमांक** 8- सदर प्रस्तावाअंतर्गत भरणा करावयाची रक्कम (वृक्षतोडची रक्कम वगळता) www.forestclerance.nic.in या संकेतस्थळावर लॉगइन करून Ad-hoc कॅम्पाचे बचत खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे.

9) **अट क्रमांक** 9- प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पा करिता पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 अंतर्गत परवानगी प्राप्त करून त्याची प्रत पुर्तता अहवाला सोबत सादर करावी.

10) **अट क्रमांक** 10- कोणत्याही प्रकारे वनक्षेत्रात मजुर कॅम्प अभारता येणार नाही.

11) **अट क्रमांक** 11- प्रस्तावित कामाचे बांधकामाकरिता जे मजुर व कर्मचारी कार्यरत असतील त्यांना यथायोग्य इंधन पुरविण्यात यावे जेणेकरून निकटचे वनक्षेत्रातील वृक्षांची हाणी होणार नाही याची दक्षता घेणेची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहिल.

12) **अट क्रमांक** 12- प्रस्तावित कामासाठी वळतेकरण करावयाचे क्षेत्रावर 4 फुट उंचीचे पक्के सिमेंट पिलर्स लावुन व त्यावर मागे व पुढे अनुक्रमांक व पिलर्स मधील अंतर नमुद करून सिमांकित करावे. सदर काम हे प्रकल्प यंत्रणेने त्याचे स्वखर्चाने करणेचे आहे.

13) **अट क्रमांक** 13- प्रस्तावाचा मंजूर ले आऊट प्लॅन कोणत्याही परिस्थितीत केंन्द्रशासनाचे मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

14) **अट क्रमांक** 14- ज्या कामाकरिता वनक्षेत्र वळते करण्यांत येत आहे, त्यांच कामाकरिता वनक्षेत्राचा वापर करणे बंधनकारक राहिल.

15) **अट क्रमांक** 15- प्रकल्प यंत्रणेस मान्य करण्यात आलेले वळतीकरण वनक्षेत्र कोणत्याही परिस्थीतीत इतर यंत्रणा वा व्यक्ती यांना केंन्द्रशासनाचे पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही.

16) **अट क्रमांक** 16- सदर प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारे वन, वनस्पती व वन्यजीवांना हानी व नुकसान होणार नाही याबाबत प्रकल्प यंत्रणेने दक्षता घ्यावी.

17) **अट क्रमांक** 17- वळते होणा-या क्षेत्रात होणारी वृक्षतोडी कमीत कमी असावी, तसेच वन विभागाच्या पर्यवेक्षणाखाली वृक्षतोड करण्यांत येईल याची दक्षता घ्यावी. सदर काम हे प्रकल्प यंत्रणेने त्याचे स्वत:चे खर्चाने करणेचे आहे.

18) **अट क्रमांक** 18- प्रकल्प यंत्रणेने जलाशय व कालवा यांचे सभोवताली वृक्षारोपवन वनविभाशी सल्लामसलत करून करणेची दक्षता घ्यावी.(As applicable)

19) **अट क्रमांक** 19- पाणलोट क्षेत्र उपचार योजना वनविभागाचे देखरेखी खाली प्रकल्पाचे खर्चांत तयार होईल याची दक्षता घ्यावी.

20) **अट क्रमांक** 20- सदर प्रकल्पा अंतर्गत टाकाऊ पदार्थ/वस्तुंचे नियोजन वनविभागाचे संमतीने करावे लागेल.

21) **अट क्रमांक** 21- घाण विल्हेवाटीसाठीचे डंपिंग क्षेत्र वनविभागाचे देखरेखी खाली सल्लामसलत करून योग्य प्रजाती लावुन स्थिरीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी. राखुन ठेवलेल्या क्षेत्रामध्येच डंपिंग साहित्य ठेवण्यांत येईल व सदरचे क्षेत्र वनविभागास हस्तांतरित करणेपुर्वी सदर डंपिंग साईटचे स्थिरीकरण व सुधारणा पुर्ण करणे बंधनकारक राहिल. तसेच डंम्पीग साहित्य बाहेर येवु नये म्हणुन संरक्षित भिंत आणि टेरेसिंग करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहिल.

22) **अट क्रमांक** 22- प्रकल्प यंत्रणा डोंगराळ भागात रस्ते बांधणीचा अनुभव असलेल्या संस्थेशी सल्लामसलत करतील ज्यामुळे लॅन्डस्लाईडीग मुळे वारंवार रस्ता अडथळा होणार नाही, आणि जेथे आवश्यक आहे तेथे विटांच्या भिंती आणि संरक्षित भिंत उभारणे बंधनकारक राहिल.

23) **अट क्रमांक** 23- प्रकल्प यंत्रणा वनीकरण संबंधित प्रकल्पाकरिता मोफत पाणी प्रदान करेल.

24) **अट क्रमांक** 24- प्रकल्प यंत्रणा यांनी आवश्यकता असल्यास वन विभागाशी सल्लामसलत करून प्रकल्प खर्चामध्ये व्यापक माती संवर्धन उपाय करावे.

25) **अट क्रमांक** 25- प्रकल्प यंत्रणा यांनी वनविभागाशी सल्लामसलत करून सदर प्रकल्पा अंतर्गत तोडण्यात येणा-या वृक्षावंर ज्या पक्षांशी आश्रयस्थाने/घरटी नष्ट झाली असेल ती निर्माण करावी व त्याची देखभाल करावी तसेच ज्या ठिकाणी कृत्रिमरित्या पक्षांची घरटी बनविण्यांत येतील अशी आश्रयस्थाने मानववस्ती व वळतीकरण होणा-या जागेच्या शेजारी असावी व सदरची कृत्रिम आश्रयस्थाने पर्यावरण पुरक साधन सामुग्रीने बनविलेली असावित.

26) **अट क्रमांक** 26- वनहक्क कायदा 2006 नुसार परिपुर्ण कार्यवाही पर्यावरण व वन मंत्रालय आणि हवामान बदल यांचे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अहवाल कागदपत्रांचे पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे.

27) **अट क्रमांक** 27- प्रकल्प यंत्रणा यांनी सहामाहि संनियंत्रण पुर्तता अहवाल केंन्द्रशासनाचे तत्वत: मान्यता पत्रातील अटीप्रमाणे 31 जुलै व 31 डिसेंबर या दिवशी प्रत्येक वर्षी सादर करणे आवश्यक आहे.

28) **अट क्रमांक** 28- राज्यशासनाकडून सनियंत्रण पुर्तता अहवाल दर वर्षी 31 जुलै व 31 डिसेंबर रोजी सादर करणे बंधनकारक राहिल.

29) अट क्रमांक 29- वन आणि वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व विकास करणे इ. बाबत केंन्द्रशासनाचे वेळोवेळी ठरवुन दिलेल्या अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहिल.

30) अट क्रमांक 30- प्रकल्प यंत्रणेने या प्रकल्प करिता लागू असलेले विविध अधिनियम, नियम व अटी तसेच मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

केंन्द्रशासनाचे पत्रातील अट क्रमांक 12 व 17 बाबत वनक्षेत्रपाल श्रीवर्धन यांचेकडून अंदाजपत्रकिय रकमेबाबत अहवाल प्राप्त झाल्यावर आपणांस वेगळयाने कळविण्यात येईल. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे केंन्द्रशासनाचे दिनांक 02/09/2017 चे पत्रातील अट क्रमांक 01 ते 30 ची परिपुर्ण पुर्तता करणे ही आपणांवर बंधनकारक आहे.

वरीलप्रमाणे सर्व रक्कम www.forestclerance.nic.in या संकेतस्थळावर लॉगईन करून चलन जनरेट करून भरणा करावी व भरणा केलेले चलनाची प्रत या कार्यालयात पुर्तता अहवाला समवेत पाठविण्यात यावी. अट निहाय पुर्तता अहवाल आंग्ल भाषेत आवश्यकत्या हमीपत्रांसह (Undertaking) दस्ताऐवजासह सहा प्रतीत या कार्यालयात सादर करावा.

आपणांकडून वरील अटीची पुर्तता करणेत आलेवर सदर प्रस्तावास अंतीम मान्यता घेणेकामी अहवाल वरीष्ठांमार्फत केंन्द्रशासनाकडे सादर करणेंत येईल.

वरील प्रस्तावांत केंन्द्रशासनाकडून व राज्य शासनाकडून अंतिम मान्यता प्राप्त होत नाही, तो पर्यन्त कोणत्याही प्रकारे वनेत्तर कामे करण्यांत येणार नाही याची दक्षता घ्यावी.

उप वनसंरक्षक,
रोहा वनविभाग, रोहा.

प्रतिलीपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपुर, यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी :- मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी :- मुख्य वनसंरक्षक (प्रा.) औरंगाबाद यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलीपी :- उप वनसंरक्षक (प्रा.) उस्मानाबाद वन विभाग, उस्मानाबाद यांचेकडे केंन्द्रशासनचे पत्रातील अट क्रमांक 2, 3, 4, 5 माहितीसाठी व पुढील कार्यवाहीठी सस्नेह अग्रेषीत.
2/-सोबत केंन्द्रशासनाचे दि.02.09.2017 रोजीचे पत्राती छायांकित प्रत जोडली आहे, त्यांनी सदर प्रकल्पा अंतर्गत त्यांचे वन विभागात उपलब्ध करून दिलेल्या वनेत्तर क्षेत्राचे 7/12 उतारा, फेरफार, नकाशा, ताबापावती, KML फाईल, टोपोशिट नकाशा इ. माहिती सदर क्षेत्रात घ्यावयाचे वनीकरणाची योजनेचे अंजदाजपत्रकसह या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावी हि विनंती. (7 प्रतीत).

प्रत :- सहा.वनसंक्षक (जंकासं व कॅम्पा) रोहा यांना माहितीसाठी व उचीत कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- वनक्षेत्रपाल श्रीवर्धन यांना माहितीसाठी व उचीत कार्यवाहीसाठी रवाना.
2/- सोबत केंन्द्रशासनाचे दि.02.09.2017 रोजीचे पत्राची छायांकित प्रत जोडून देण्यात येत आहे.
3/- केंन्द्रशासनाचे पत्रातील अट क्रमांक 12 व 17 बाबत रक्कम अंदाजपत्रकासह या कार्यालयात तात्काळ कळवावी.

सही
उप वनसंरक्षक,
रोहा वनविभाग, रोहा.